



महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
४ था मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दुरध्वनी क्र. : ०२२-२२७९ ३८३७ Email ID : sec.ud2@maharshtra.gov.in

---

क्रमांक : एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दिनांक : १० जून, २०२५.

(निवडणूक प्राथम्य)

बृहन्मुंबई महानगरपालिकेची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश-२०२५

आदेश

ज्याअर्थी, सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, दि.११.०३.२०२२, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम १९ पोट-कलम (१) खंड (अ) मधील तरतुदीनुसार पालिका सदस्यांच्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी प्रत्येक शहर ज्या प्रभागात विभागले जाईल त्या प्रभागांची संख्या व सीमा राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्तांच्या मान्यतेने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करतील अशी तरतूद करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, सन २०२२ मुंबई महानगरपालिका अधिनियम क्रमांक ४३, दि.०८.०९.२०२२ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या २२७ अशी निश्चित करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ मध्ये दि.०६ मे, २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तात्काळ घेणे आवश्यक असून सदर निवडणुका या याचिकेतील निर्णयाच्या अधीन राहणार आहेत.

आणि ज्याअर्थी, महानगरपालिकांच्या निवडणूक प्रक्रीयेमध्ये (१) प्रभाग रचना करणे व आरक्षण ठरविणे (२) विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करणे आणि (३) प्रत्यक्ष

निवडणूक घेणे अशा तीन प्रमुख टप्प्यांचा समावेश होतो व या तिन्ही टप्प्यांच्या प्रक्रियेमध्ये विविध उप-टप्पे आहेत.

आणि ज्याअर्थी, महानगरपालिकांच्या निवडणुकीसंदर्भातील विविध टप्पे व उप-टप्पे पूर्ण करण्याकरिता लागणारा कालावधी व मा. सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त निर्देश विचारात घेता निवडणुकांची प्रक्रिया तात्काळ सुरू करणे आवश्यक असून, मुंबई महानगरपालिका अधिनियमातील उपरोक्त सुधारणांना अनुसरून निवडणुकांकरीता प्रभाग रचना करण्याबाबत आदेश देणे आवश्यक आहे.,

त्याअर्थी, शासन मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम १९ पोट-कलम (१) खंड (अ) नुसार मिळालेल्या अधिकारांचा व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य शासन, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभाग रचना आराखडा तयार करणे इत्यादी करीता खालीलप्रमाणे आदेश देत आहे.:-

१. **<u>संक्षिप्त नाव:</u>**

या आदेशाला " **बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक (प्रभाग रचना) आदेश, २०२५"** असे संबोधिले जाईल.

२. **<u>अधिकार प्रदान:</u>**

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम १९ पोट-कलम (१) खंड (अ) मधील तरतुदीनुसार निवडणुकीकरिता प्रभाग रचना शासनाने, राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने करावयाची आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेतील प्रभाग रचनेचे प्रारुप तयार करण्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांची असेल. महानगरपालिका आयुक्त यांनी या निवडणुकांचे कामकाज पार पाडतांना लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेणे आवश्यक आहे. ही जबाबदारी पार पाडताना निवडणुकांचे पावित्र्य राखणे आणि निवडणूक प्रक्रिया मुक्त, न्याय्य व पारदर्शक रितीने पार पडेल हे महानगरपालिका आयुक्त यांनी पाहणे अत्यंत आवश्यक आहे.

३. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग रचना संदर्भातील विविध टप्पे व त्यासाठीचे जबाबदार असलेले संबंधित अधिकारी पुढील प्रमाणे असतील-

अ.क्र.	टप्पा	संबंधित अधिकारी
१	प्रारुप प्रभाग रचना तयार करुन राज्य निवडणूक आयोगाची मान्यता घेणे.	आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका
२	प्रारुप प्रभाग रचनेस मान्यता देणे	राज्य निवडणूक आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी
३	प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करणे	आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका
४	प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे	राज्य शासनाने प्राधिकृत केलेले अधिकारी
५	प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या सुनावणीनंतर अंतिम केलेल्या प्रभाग रचनेचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेस्तव सादर करणे.	प्राधिकृत अधिकारी (आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यामार्फत)
६	अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे	राज्य निवडणूक आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी
७	अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करणे.	आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका

४. विहित मुदतीत निवडणूक घेणे:

भारतीय संविधानाने विहित केलेल्या मुदतीतच निवडणूक घेणे शक्य व्हावे म्हणून, राज्य शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेची मुदत ज्या दिनांकास संपत असेल त्या दिनांकाच्या सहा महिने अगोदरच्या कालावधीमध्ये बृहन्मुंबई महापालिकेच्या क्षेत्रात व हद्दीमध्ये बदल (विभाजन, एकत्रीकरण इत्यादी) करू नये. याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे दि.२७ जानेवारी, २००५ चे आदेश आहेत.

५. प्रभाग रचना करण्याची कार्यपद्धती:

५.१ **जनगणनेची लोकसंख्या:** जनगणना कार्यालयाने प्रसिध्द केलेली लगतच्या जनगणनेनुसार महानगरपालिका क्षेत्राची प्रगणक गटनिहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची व अनुसूचित जमातीची लोकसंख्या, प्रगणक गटाचे नकाशे व घरयादी जनगणना कार्यालयाकडून उपलब्ध करून घ्यावी. प्रभाग रचना ही फक्त **लगतच्या जनगणनेच्या**

लोकसंख्येच्या आधारे केली जाते, म्हणून त्या क्षेत्रातील मतदार संख्या अथवा सध्याची रहिवाशांची संख्या विचारात घेता येत नाही व त्याचा प्रभाग रचनेशी कसलाही संबंध येत नाही.

५.२ सदस्य संख्या: सन २०२२ चा मुंबई महानगरपालिका अधिनियम क्रमांक ४३, दि.०८.०९.२०२२ नुसार एकूण सदस्यांची संख्या २२७ इतकी निश्चित करण्यात आलेली आहे.

५.३ प्रभागांची संख्या: बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये प्रत्येक प्रभागातून एक सदस्य निवडून देण्याची तरतूद आहे. अधिनियमातील सुधारणेनुसार महानगरपालिकेस २२७ प्रभाग अनुज्ञेय होतात.

५.४ प्रभागांची सरासरी लोकसंख्या :- प्रभाग रचना करताना महानगरपालिकेची एकूण लोकसंख्या भागिले महानगरपालिकेची एकूण सदस्य संख्या या सूत्रानुसार एका प्रभागात समाविष्ट करावयाची सरासरी लोकसंख्या निश्चित करावी. प्रभागाची लोकसंख्या त्या प्रभागाच्या सरासरी लोकसंख्येच्या १० टक्के कमी किंवा १० टक्के जास्त या मर्यादेत ठेवता येईल. एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत प्रभागाची लोकसंख्या या किमान किंवा कमाल मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त असल्यास त्याचे कारण प्रभाग रचनेच्या प्रस्तावात नमूद करणे आवश्यक राहील.

५.५ <u>प्रभाग रचना करण्याची मार्गदर्शक तत्वे:</u>

५.५.१ प्रभाग रचना सुरु करताना सर्वप्रथम उत्तर दिशेकडून सुरुवात करावी. उत्तरेकडून ईशान्य (उत्तर-पूर्व) त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रभाग रचना करत सरकावे व शेवट दक्षिणेत करावा. प्रभागांना क्रमांकही त्याच पध्दतीने द्यावेत. प्रभाग रचना करताना भौगोलिक सलगता राहील, याची काळजी घ्यावी

५.५.२ प्रभागाच्या सीमारेषा, मोठे रस्ते, गल्ल्या, नद्या, नाले, डोंगर, रस्ते, रेल्वे रूळ, फ्लायओव्हर इत्यादी नैसर्गिक मर्यादा विचारात घेऊन निश्चित करावी. कोणत्याही परिस्थितीत एका इमारतीचे, चाळीचे, घराचे विभाजन दोन प्रभागांमध्ये होणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे मोकळया जागांसह सर्व जागा कोणत्या ना कोणत्या

प्रभागात आल्याच पाहिजेत. प्रभाग रचनेच्या बाबतीत कोणासही शंका घेण्यास वाव राहणार नाही,याची दक्षता घेण्यात यावी. सीमेचे वर्णन करताना रस्ते, रेल्वे, नाले, नद्या, सिटी सर्व्हे नंबर यांचे उल्लेख प्रामुख्याने यावयास हवे.

५.५.३ प्रभाग रचना करताना लोकसंख्या व प्रभागाची भौगोलिकदृष्टया आटोपशीर व्याप्ती या दोन मुख्य गोष्टी असल्या तरी नागरिकांच्या सामायिक हिताकरिता खालील बाबी विचारात घ्याव्यात.:-

(अ) प्रभागातील वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(ब) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यांच्या वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(क) नागरिकांचे प्रभागामधील दळणवळण शक्यतो विचारात घ्यावे.

(ड) प्राथमिक आरोग्य सुविधा केंद्रे, दवाखाने, स्मशानभूमी, बाजारहाटाच्या जागा, पाणी पुरवठयाच्या तसेच जलनि:सारणाच्या सोयी सुविधा, इ.चा वापर ज्या नागरिकांकडून करण्यात येतो त्या नागरिकांचा समावेश असलेल्या प्रभागातच शक्यतोवर त्या सोयी सुविधा ठेवण्यात याव्यात.

(इ) प्रभागातील मुलांकरिता सर्वसाधारणपणे उपलब्ध असणाऱ्या प्राथमिक शाळा, मैदाने, इ. शक्यतोवर त्याच प्रभागात ठेवण्यात याव्यात.

५.५.४ प्रभाग रचना करताना प्रगणक गट फोडू नये. अपवादात्मक परिस्थितीमध्ये प्रभाग रचना करण्याकरिता प्रगणक गट फोडणे आवश्यक असेल व घरयादी उपलब्ध नसेल, तर त्या प्रकरणी सोबतच्या **परिशिष्ट-५** मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्वेक्षण करून संबंधित क्षेत्रात लगतच्या जनगणनेच्या वेळी लोकसंख्या कशाप्रकारे वितरित झाली होती, हे निश्चित करावे. सर्वेक्षण करताना जनगणना ज्यावेळी झाली त्यावेळी म्हणजे २०११ मध्ये लोकसंख्येचे वितरण कसे होते, हे जाणून घ्यावयाचे असल्याने सर्वेक्षण करताना २०११ मध्ये जनगणनेच्यावेळी संबंधित व्यक्ती दिलेल्या पत्त्यावर राहत होती किंवा कसे, संबंधित इमारत कधी बांधण्यात आली इत्यादी बाबी लक्षात घ्याव्यात.

५.५.५ प्रत्येक प्रभागाच्या सीमारेषेचे वर्णन करताना उत्तर, पूर्व, दक्षिण व पश्चिम अशा दिशा नमूद करून सीमारेषेचे वर्णन करावे. सीमारेषा नमूद करताना शहरातील सर्वसाधारण नागरिकांना प्रभागाची पूर्ण कल्पना येईल याची काळजी घ्यावी.

५.५.६ प्रभाग रचनेमध्ये प्रभागांना अनुक्रमांक देण्यात येतात. प्रभागाचे क्षेत्र तात्काळ लक्षात यावे याकरिता प्रभागांना अनुक्रमांकासोबत प्रभागाचे नाव देता येईल किंवा कसे हे तपासावे. प्रभागांना नाव देणे हे बंधनकारक नाही. तथापि, महानगरपालिका आयुक्त प्रभागांना नाव देण्याबाबत निर्णय घेऊ शकतात. प्रभागांना नाव द्यावयाचे झाल्यास ते अशाप्रकारे देण्यात यावे जेणेकरुन सदर प्रभाग कोणत्या क्षेत्रातील आहे हे तात्काळ लक्षात येईल. उदा. त्या प्रभागातील प्रसिध्द असलेले महत्वाचे ठिकाण अथवा त्या प्रभागातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले एखादे नगर अथवा वस्ती, इ.

५.६ <u>प्रभागाची लोकसंख्या आणि मर्यादेचे पालन:</u>

प्रभाग रचना करताना प्रभागातील सरासरी लोकसंख्या, जागांचे गुणोत्तर आणि १० टक्के कमाल/ किमान मर्यादेचे पालन करावे. अपवादात्मक परिस्थितीत भौगोलिक परिस्थितीमुळे अगर प्रगणक गट न फोडल्यामुळे प्रभागाची लोकसंख्या अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी अगर जास्त होत असल्यास त्याची कारणे प्रभाग रचनेच्या प्रस्तावात नमूद करणे आवश्यक आहे. अशा प्रभागांच्या बाबतीत राज्य निवडणूक आयोगाची अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांची मान्यता असणे आवश्यक आहे.

५.७ <u>गुगल मॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करणे:</u>

५.७.१ महानगरपालिकेच्या प्रभाग रचनेची मांडणी गुगल अर्थच्या नकाशावर खालीलप्रमाणे करणे अनिवार्य आहे :-

(i) गुगल अर्थचा नकाशा, या नकाशावर प्रगणक गटांच्या सीमा हिरव्या रंगाने दर्शवाव्यात. प्रगणक गटांचे क्रमांक व त्या प्रगणक गटांची लोकसंख्या दर्शवावी. प्रत्येक प्रगणक गटाच्या बहुभूजास त्या प्रगणक गटाचा क्रमांक, एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या आणि अनुसूचित जमातीची लोकसंख्या लेजेंडमध्ये भरावी.

(ii) जनगणना प्रभागांच्या सीमा निळया रंगाने दर्शवाव्यात.

(iii) नकाशावर शहरातील महत्वाची ठिकाणे, रस्ते, नद्या, नाले, रेल्वे लाईन इत्यादी स्पष्टपणे दर्शवावे.

(iv) नवीन निवडणूक प्रभागांच्या हद्दी लाल रंगाने दर्शविण्यात याव्यात.

(v) नकाशांचा आकार, नकाशावर दर्शविलेले प्रगणक गटांचे क्रमांक, लोकसंख्या, इत्यादी तपशील वाचता येईल या प्रमाणात असावा. नकाशे सुलभपणे हाताळता यावेत याकरिता आवश्यक असल्यास दोन किंवा तीन भागात नकाशे तयार करावेत.

(vi) प्रत्येक प्रभागाचा स्वतंत्र नकाशा तयार करावा, त्याच्या हद्दी स्पष्टपणे दर्शविण्यात याव्यात. त्या हद्दींवर असणारे रस्ते, नद्या, नाले, रेल्वे लाईन इत्यादी स्पष्टपणे नकाशावर नमूद करावेत.

(vii) प्रत्येक प्रभागामध्ये समाविष्ट झालेले प्रगणक गट व नकाशानुसार त्या प्रभागामध्ये समाविष्ट होणारे प्रगणक गट एकच आहेत, याची खात्री करावी. तसेच जनगणनेकडून प्राप्त झालेली लोकसंख्येची आकडेवारी योग्यरित्या दर्शविण्यात आली आहे, याची खात्री करावी.

५.७.२ शासन आदेश, आयोगाचे निकष तसेच, अधिनियमातील व नियमातील तरतुदी, मा.सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाने दिलेले निदेश विचारात घेऊन प्रारुप प्रभाग रचना तयार करावी.

५.७.३ मागील अनेक निवडणुकांमध्ये निदर्शनास आले नुसार अयोग्य प्रकारे प्रभाग रचना केली गेल्यामुळे अनेक रिट याचिका मा. उच्च न्यायालयात दाखल झाल्या आहेत. काही याचिकांमध्ये अशा चुकीच्या प्रभाग रचनेबाबत न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. यामुळे तयार केलेला प्रभाग रचनेचा आराखडा योग्य प्रकारे तयार करण्यात आला असून, नियम व निकषांचे पालन झाले आहे याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची असेल.

५.७.४ वरील परिच्छेदानुसार कार्यवाही करून प्रभाग रचना आराखडा जतन करण्यात येईल व प्रारुप प्रसिध्दीच्या दिनांकापर्यंत त्याची गोपनीयता राखण्यात येईल. यासाठी परिच्छेद ६.१ मध्ये नमूद केल्यानुसार नियुक्त करण्यात आलेल्या समितीव्यतिरिक्त इतर कोणालाही आराखड्याची माहिती दिली जाणार नाही.

५.७.५ अशा तयार केलेल्या नकाशाची केएमएल (KML)/ केएमझेड (KMZ) फाईल तयार करावी. संपूर्ण हद्दीची तसेच प्रभागनिहाय ईमेज फाईल देखील तयार करावी. गुगल अर्थच्या नकाशावर प्रभाग रचना मांडणी करण्याची कार्यपध्दती **परिशिष्ट ७** मध्ये देण्यात आली आहे. या कार्यपध्दतीचा अवलंब करून केएमएल (KML)/ केएमझेड (KMZ) फाईल तयार करावी.

५.७.६ प्रत्येक प्रभागामध्ये समाविष्ट झालेले प्रगणक गट व नकाशानुसार त्या प्रभागामध्ये समाविष्ट होणारे प्रगणक गट एकच आहेत, याची खात्री करावी. तसेच जनगणना कार्यालयाकडून प्राप्त झालेली लोकसंख्येची आकडेवारी योग्यरित्या दर्शविण्यात आली आहे, याची खात्री करावी.

५.८ त्यानंतर प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव महानगरपालिका आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे तयार करावा:-

i. परिशिष्ट १ - सदस्य संख्या व प्रभागांची संख्या यांची परिगणना.
ii. परिशिष्ट २ व २ अ- हद्दींची व्याप्ती व वर्णनाबाबत.
iii. परिशिष्ट ३ - निवडणूक प्रभागांमध्ये समाविष्ट प्रगणक गट व लोकसंख्या
iv. परिशिष्ट ४ - प्रगणक गटनिहाय माहिती.
v. परिशिष्ट ५ - प्रगणक गटाचे विभाजन करताना द्यावयाचे प्रमाणपत्र.
vi. परिशिष्ट ६ - महानगरपालिका आयुक्तांनी प्रारुप प्रभाग रचनेबाबत द्यावयाचे प्रमाणपत्र.

६. प्रारूप प्रभाग रचना

६.१ **प्रभाग रचनेची प्राथमिक तपासणी :** सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारुप प्रभाग रचना तयार करण्याकरिता आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखालील अधिकाऱ्यांची समिती तयार करण्यात यावी.

i. महानगरपालिका क्षेत्राची संपूर्ण माहिती असलेला अधिकारी.
ii. प्रभाग रचनेशी संबंधित नेमलेला अधिकारी.
iii. नगर रचनाकार.
iv. संगणक तज्ञ.
v. आवश्यकतेनुसार इतर अधिकारी.

प्रारुप प्रभाग रचना राज्य शासनाच्या आदेशानुसार व योग्य ती दक्षता घेऊन तयार करण्याची जबाबदारी या समितीची असेल.

६.२ <u>**प्रारूप तयार करणे**</u>**:** प्रभाग रचनेशी संबंधित अधिकाऱ्यांनी तयार केलेला प्रारूप आराखडा प्रभाग रचना समितीसमोर ठेवण्यात येईल. सदर समिती हा आराखडा अधिनियमातील तरतूदी, नियमातील तरतूदी व या आदेशातील तरतूदी व राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशातील तरतूदींचे पालन करून तयार केला आहे हे तपासेल. सदर समिती प्रारूप प्रभाग रचनेचे गुगल अर्थ नकाशे **परिच्छेद- ५.७** नुसार योग्य रितीने तयार केले आहेत किंवा कसे हे तपासून घेईल, अन्यथा योग्य नकाशे तयार करून घेण्याची कार्यवाही करेल. प्रभाग रचना पूर्वतयारीची संपूर्ण जबाबदारी महानगरपालिका आयुक्त यांची राहील.

६.३ <u>**प्रारूप प्रभाग रचनेस मान्यता**</u>**:** प्रारूप प्रभाग रचनेची समितीने तपासणी केल्यानंतर प्रभाग रचनेच्या योग्यते बाबत समितीचे समाधान झाल्यानंतर सदर समिती त्याबाबत विहित केलेल्या **परिशिष्ट-६** मधील नमुन्यात प्रमाणपत्र देईल. महानगरपालिका आयुक्त हे प्रारूप प्रभाग रचनेच्या प्रस्तावाची तपासणी करून वरील प्रमाणपत्रासह प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव निवडणुक आयोगास सादर करेल.

६.४ राज्य निवडणूक आयोगाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दिसाठी निवडणुक आयोग महानगरपालिका आयुक्तांकडे पाठवेल.

७. <u>**प्रारूप प्रभाग रचनेची व्यापक प्रसिद्धी:**</u>

७.१ प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना महानगरपालिका आयुक्त यांनी राज्य शासनाने निश्चित केलेल्या दिनांकास शासन राजपत्रात प्रसिध्द करावी. (प्रारुप अधिसूचनेचा नमुना **परिशिष्ट-८ (मराठी) व ९ (इंग्रजी)** मध्ये देण्यात आलेला आहे.)

७.२ त्याच दिनांकास सोबतच्या **परिशिष्ट - १० (मराठी) व परिशिष्ट - ११ (इंग्रजी) मधील नमुन्यात वर्तमानपत्रात जाहिरात** द्यावी.

७.३ राज्य निवडणूक आयुक्त यांनी मान्यता दिलेला सर्व प्रभागांचा एकत्रित नकाशा (नकाशा - अ) तसेच प्रत्येक प्रभागाचे नकाशे (नकाशा - ब) आणि अधिसुचना महानगरपालिकेच्या

कार्यालयातील दर्शनी भाग / हॉल येथे सर्व जनतेस सुलभतेने पाहता येईल अशा पध्दतीने प्रसिध्द करावेत.

७.४ राज्य निवडणूक आयुक्त यांनी मान्यता दिलेला नकाशा - अ व नकाशा - ब चे पीडीएफ संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.

७.५ प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारुप प्रभाग रचनेच्या नकाशांवर व विहित नमुन्यांवर संबंधीत महानगरपालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त (निवडणूक) व उपायुक्त (नगररचना) अथवा मुख्य अभियंता (नगररचना) यांच्या स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.

७.६ सदर प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेवर, हरकती व सूचना कोणत्या कालावधी मध्ये, कोणत्या ठिकाणी दाखल करता येतील, याबाबत योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

८. हरकती व सूचना:

८.१ नागरिकांना प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना सादर करण्याच्या कालावधीची माहिती देण्यात येईल.

८.२ हरकती व सूचना सादर करण्याच्या कालावधीत नागरिकांकडून हरकती व सूचना स्विकारण्याची व्यवस्था महानगरपालिका कार्यालयात करण्यात येईल.

८.३ हरकत किंवा सूचना दाखल केल्याची संबंधीतांना पोचपावती देण्यात यावी, ज्यामध्ये त्यांनी हरकत सादर करतानाचा दिनांक व वेळ नमूद केला जाईल.

८.४ आलेल्या हरकती व सूचनांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे.

८.५ प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांचा गोषवारा **परिशिष्ट १२** नुसार तयार करण्यात येईल आणि सदर गोषवारा राज्य निवडणूक आयोगास सादर करण्यात येईल.

८.६ प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना व त्यावर हरकती व सूचना स्विकारण्याचा कालावधी व त्या कोणामार्फत स्विकारण्यात येतील यांचा तपशील यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, महानगरपालिका व प्रभाग कार्यालयांचे सूचना फलक, संकेतस्थळ, इत्यादी)

८.७ प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांची योग्यरितीने दखल घेण्यात येईल, याची उपाययोजना महानगरपालिका आयुक्तांनी करावी. (उदा. प्राप्त होणाऱ्या

हरकती व सूचनांची नोंदवही ठेवणे, हरकती कोणामार्फत स्विकारण्यात येतील यांची निश्चिती, प्रत्येक हरकती व सूचनांना क्रमांक देणे, हरकतीचे स्वरुप नमूद करणे, इत्यादी)

९. <u>प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देणे</u>-

९.१ शासनाने प्राधिकृत केलेले सक्षम प्राधिकारी, प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर निश्चित केलेल्या स्थळी व निश्चित केलेल्या दिनांकास/ कालावधीमध्ये सुनावणी देतील.

९.२ सदर सुनावणी महानगरपालिका क्षेत्रात घेण्यात येईल व महानगरपालिका आयुक्त यांनी सदर सुनावणीस उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

९.३ या सुनावणीकरिता सर्व व्यवस्था (उदा. हरकतदारांना सुनावणीची लेखी नोटीस देणे, उपस्थितांची स्वाक्षरी घेणे, सुनावणीचे विवरणपत्र ठेवणे, सुनावणीच्या ठिकाणी व्हिडिओ चित्रीकरणाची व्यवस्था करणे, इत्यादी) महानगरपालिका आयुक्त यांनी करावी.

९.४ सुनावणीच्यावेळी केलेली प्रारुप प्रभाग रचना सर्वांना दिसेल अशाप्रकारे मोठ्या स्क्रीनवर दर्शविण्यात यावी. प्रभागांच्या हद्दीबाबत असलेल्या हरकतींसंदर्भात गुगल अर्थच्या नकाशावर सध्याचे प्रारुप प्रभाग व हरकतदाराने प्रभागांच्या हद्दीमध्ये मागणी केलेले बदल स्क्रीनवर दाखविण्यात यावेत.

९.५ हरकती व सूचनांना सुनावणी देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याने प्रत्येक तक्रार व सूचनांची दखल घेऊन नियमाप्रमाणे योग्य ते अभिप्राय देणे आवश्यक आहे. अंतिम प्रभाग रचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येते. त्यामुळे त्यांनी घेतलेला निर्णय अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविण्याची आवश्यकता नाही.

१०. <u>अंतिम प्रभाग रचना:</u>

१०.१ शासनाने सुनावणीकरिता प्राधिकृत केलेले अधिकारी यांनी, सुनावणी घेतल्यानंतर **परिशिष्ट-१३** मधील हरकती व सूचनांवर दिलेल्या सुनावणीवरील शिफारशींसह तयार केलेला अंतीम प्रभाग रचनेचा प्रस्ताव महानगरपालिका आयुक्त यांच्यामार्फत निवडणुक आयोगाच्या मान्यतेसाठी निश्चित केलेल्या दिनांकापर्यंत सादर करावा.

१०.२ प्रभाग रचनेच्या अंतिम प्रस्तावास राज्य निवडणूक आयोगाची वरीलप्रमाणे मान्यता मिळाल्यानंतर संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी त्यानुसार प्रभाग रचनेच्या प्रस्तावात (सर्व विवरणपत्रे, नकाशे व अधिसूचना) योग्य ते बदल करावेत. त्यानंतर अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना शासनाने निश्चित केलेल्या दिनांकास राजपत्रात प्रसिध्द करावी. (**अंतीम अधिसूचनेचा नमुना परिशिष्ट-१४ (मराठी) व परिशिष्ट-१५ (इंग्रजी)** मध्ये देण्यात आलेला आहे.)

१०.३ या अंतिम अधिसूचनेला व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, महानगरपालिका व प्रभाग कार्यालयांचे सूचना फलक / संकेतस्थळ राज्य निवडणूक आयोगाची संकेतस्थळ, इत्यादी) अंतिम प्रभाग रचनेच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेच्या **दोन प्रती** राज्य शासनास/ राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात याव्यात.

१०.४ प्रभाग रचनेच्या (प्रारुप व अंतिम) प्रसिध्द करण्यात येणाऱ्या नकाशांवर संबंधीत महानगरपालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त (निवडणूक) व उपायुक्त (नगररचना) अथवा मुख्य अभियंता (नगररचना) यांच्या यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे. तसेच सर्व परिशिष्टांवर महानगरपालिका आयुक्तांची स्वाक्षरी आवश्यक राहील.

१०.५ यानंतर अंतिम प्रभाग रचनेवर कोणतीही हरकत अगर सुनावणी नियमानुसार अभिप्रेत नाही.

११. <u>गोपनीयता</u>: स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रभाग रचनेचे कामकाज गोपनीयरित्या हाताळण्यात यावे. प्रभाग रचनेची माहिती ही सर्वसामान्य नागरिकांना प्रारूप प्रसिध्दीच्या वेळी पहिल्यांदा समजते. तत्पूर्वी राजकीय व्यक्ती, प्रसिध्दी माध्यमे अथवा अन्य व्यक्तींना याबाबतची माहिती देता येणार नाही तसेच प्रभाग रचनेच्या कामाशी संबंधित अधिकारी अगर कर्मचारी यांच्यावर त्यासाठी कोणालाही दबाव टाकता येणार नाही. कोणत्याही अधिकाऱ्याने/ कर्मचाऱ्याने प्रभाग रचनेची गोपनियता भंग केल्यास त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

१२. **<u>सर्वसाधारण:-</u>**

१२.१ मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम १९ पोट-कलम (१) खंड (अ) नुसार तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार प्रभाग रचनेसंदर्भातील पूर्ण अधिकार राज्य शासनास,राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने वापरावयाचे आहेत. त्यामुळे महानगरपालिका आयुक्त यांना स्वतःहून प्रभाग रचनेच्या कार्यक्रमात कोणताही बदल अगर स्थगिती देता येत नाही.

१२.२ यापुढे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकांमध्ये केवळ **"बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक (प्रभाग रचना) आदेश, २०२५"** या आदेशामध्ये केलेल्या तरतूदी लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०६१०१९५२५७६९२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

GOVINDARAJ KORAMANNA HIRANYA GOWDA

Digitally signed by GOVINDARAJ KORAMANNA HIRANYA GOWDA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=10a32fa5e4e3aa5a8332798cc4e6ba14f319051955769f69e69187ed22d67f03, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4B6A32EE2B0D37280E72D06B8D130B85460D5AD93BDAC010E0B42FDCCD8715E6, cn=GOVINDARAJ KORAMANNA HIRANYA GOWDA
Date: 2025.06.10 19:55:26 +05'30'

(डॉ.के.एच.गोविंदराज)
प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन

<u>सहपत्र</u> :-

सोबतच्या अनुक्रमणिकेत दर्शविल्यानुसार परिशिष्ट १ ते १५ .

प्रति, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका उचित कार्यवाहीकरीता

प्रत - माहितीकरीता

१. सचिव, राज्य निवडणूक आयोग.
२. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग,(नवि-१).
३. विभागीय आयुक्त, कोकण विभाग
४. जिल्हाधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर
५. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील शासनाचे वकील.
६. निवड नस्ती.

परिशिष्टांची अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशिल	परिशिष्ट क्रमांक
१	सदस्य संख्या व प्रभागांची संख्या याची परिगणना.	परिशिष्ट - १
२	हद्दींची व्याप्ती व वर्णनाबाबत.	परिशिष्ट - २ व २अ
३	निवडणूक प्रभागांमध्ये समाविष्ट प्रगणक गट व लोकसंख्या	परिशिष्ट - ३
४	प्रगणक गटनिहाय माहिती.	परिशिष्ट - ४
५	प्रगणक गटाचे विभाजन करताना द्यावयाचे प्रमाणपत्र.	परिशिष्ट - ५
६	महानगरपालिका आयुक्तांनी प्रारुप प्रभाग रचनेबाबत द्यावयाचे प्रमाणपत्र	परिशिष्ट - ६
७	गुगल अर्थच्या नकाशावर प्रभाग रचना मांडणी करण्याची कार्यपध्दती	परिशिष्ट - ७
८	प्रारुप प्रभाग रचनेच्या अधिसूचनेचा नमुना - मराठी	परिशिष्ट - ८
९	प्रारुप प्रभाग रचनेच्या अधिसूचनेचा नमुना - इंग्रजी	परिशिष्ट - ९
१०	प्रारुप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दी- जाहीर सूचनेचा नमुना-मराठी	परिशिष्ट - १०
११	प्रारुप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दी-जाहीर सूचनेचा नमुना- इंग्रजी	परिशिष्ट - ११
१२	हरकती व सूचनांचा गोषवारा	परिशिष्ट - १२
१३	हरकती व सूचनांवर दिलेल्या सुनावणींवरील शिफारशी	परिशिष्ट - १३
१४	अंतिम प्रभाग रचनेच्या अधिसूचनेचा नमुना - मराठी	परिशिष्ट - १४
१५	अंतिम प्रभाग रचनेच्या अधिसूचनेचा नमुना - इंग्रजी	परिशिष्ट - १५

परिशिष्ट - १

(सदस्य संख्या व प्रभागांची संख्या याची परिगणना.)

बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -----

१. महानगरपालिका क्षेत्राची एकूण लोकसंख्या
(लगतच्या जनगणनेनुसार) -

२. अनुसूचित जातीची लोकसंख्या -
(लगतच्या जनगणनेनुसार)

३. अनुसूचित जमातीची लोकसंख्या -
(लगतच्या जनगणनेनुसार)

४. निवडून द्यावयाच्या महानगरपालिका सदस्यांची संख्या -

५. प्रभागांची एकूण संख्या -

६. प्रभागाची सरासरी लोकसंख्या

$$= \frac{\text{महानगरपालिकेची एकूण लोकसंख्या (अनु.क्र.1)}}{\text{महानगरपालिकेची एकूण सदस्य संख्या (अनु.क्र.4)}} =$$

सरासरी लोकसंख्या	कमाल (+) १०%	किमान (-) १०%

सही

आयुक्त, ... महानगरपालिका

परिशिष्ट-२

(हद्दींची व्याप्ती व वर्णनाबाबत)

.... महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक ----

प्रभाग क्रमांक व लोकसंख्या	प्रभागाचे नाव असल्यास	प्रभागाची व्याप्ती (प्रभागातील थोडक्यात महत्त्वाची ठिकाणे/परिसर/नगरे इ. नमूद करावीत)	प्रभागाच्या सीमा	निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या
१	२	३	४	५
१. लोकसंख्या एकूण - अ.जा. - अ.ज. -			स्थाने उत्तर - पूर्व - दक्षिण - पश्चिम -	
२. लोकसंख्या एकूण - अ.जा. - अ.ज. -			स्थाने उत्तर - पूर्व - दक्षिण - पश्चिम -	
. .				

सही

आयुक्त, ...महानगरपालिका

परिशिष्ट २अ

(Extent of the Ward Boundaries and its descriptions)

---------- Municipal Corporation General Election ------

Ward No. & Population	Name of the ward, if any	Extent of the Ward (mention prominent places / area / nagar etc.)	Ward boundries	Number of Councilors to be elected
(1)	(2)	(3)	(4)	(5)
1. Population Total- SC - ST -			Location – North- East- South- West-	
2. Population Total- SC - ST -			Location – North- East- South- West-	
. .				

Sign

Commissioner, ...

Municipal Corporation

परिशिष्ट – 3						
निवडणूक प्रभागांमध्ये समाविष्ट प्रगणक गट व लोकसंख्या						
Enumeration Block included in Election ward and their Population						
………………... MUNICIPAL CORPORATION						
Election Ward No.	**Census Enumeration**		**Total Population**	**SC Population**	**ST Population**
	Ward No.	**Block No.**			
1					
Total					
2					
Total					
3					

Sign
Commissioner, ……………
Municipal Corporation

परिशिष्ट ४						
प्रगणक गटनिहाय माहिती						
ENUMARATION BLOCKWISE INFORMATION						
………………... MUNICIPAL CORPORATION						
SR. No.	**Enumaration Ward No.**	**Enumaration Block No.**	**Total Population**	**SC**	**ST**	**WARD NO. IN Which the EB is included**

Sign

Commissioner, ...

Municipal Corporation

नमुना विवरणपत्र						
………………... MUNICIPAL CORPORATION						
SR. No.	**Enumaration Ward No.**	**Enumaration Block No.**	**Total Population**	**SC**	**ST**	**WARD NO. IN Which the EB is included**
१	१	१	..	…	…	१
२	१	३	..	…	…	५
३	१	४	..	…	…	१
४	२	१	..	…	…	६
५	२	२	..	…	…	६
६	२	३	..	…	…	२
७	२	४	..	…	…	२
.	.					
.	.					
	याप्रमाणे	याप्रमाणे				

परिशिष्ट – ५

(प्रगणक गटाचे विभाजन करताना द्यावयाचे प्रमाणपत्र)

जनगणना प्रभाग क्रमांक – – – – – – – – – – – पैकी प्रगणक गट क्रमांक – – – – – – – फोडणे आवश्यक ठरेल त्याची चौकशी करुन लोकसंख्या निश्चित केली त्याचा तपशिल

सर्वेक्षण केल्याची तारीख :-----------------

अ.क्र.	जनगणना घर क्रमांक	कुटुंब प्रमुखाचे नाव	सन २०११ ची लोकसंख्या	अनुसूचित जाती (असल्यास लोकसंख्या)	अनुसूचित जमाती (असल्यास लोकसंख्या)
१	२	३	४	५	६
	एकूण				

	एकूण	अनुसूचित जाती	अनुसूचित जमाती
१. प्रगणक गटाची लोकसंख्या			
२. फोडलेल्या प्रगणक गटाचे सर्वेक्षण प्रमाणे निश्चित केलेली लोकसंख्या (वजा)			
	– –		
३. लगतच्या निवडणूक प्रभागांसाठी विचारात घ्यावयाची उर्वरित लोकसंख्या (वरील १ – २)	– –		

उपायुक्त
-------------महानगरपालिका

आयुक्त
-------------महानगरपालिका

परिशिष्ट ६

(महानगरपालिका आयुक्तांनी प्रारुप प्रभाग रचनेबाबत द्यावयाचे प्रमाणपत्र)

प्रारुप प्रभाग रचना

महानगरपालिकेचे नाव - ....

प्रमाणित करण्यात येते की, -------------------महानगरपालिकेच्या सन -------- मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेली प्रारुप प्रभाग रचना खालील दक्षता घेऊन करण्यात आलेली आहे.

१) जनगणना कार्यालयाकडून प्राप्त सन २०११ च्या लोकसंख्येची आकडेवारी व प्रगणक गटांचे नकाशे वापरण्यात आलेले आहेत.

२) ज्या ठिकाणी जनगणना कार्यालयाकडून माहिती प्राप्त झालेली नाही (त्या आशयाचे संचालक, जनगणना कार्यालयाचे प्रमाणपत्र आवश्यक) तेथे २०११ ची लोकसंख्या सर्वेक्षण करुन निश्चित करण्यात आलेली आहे.

३) प्रत्येक प्रभागामध्ये येणारे प्रगणक गट, नकाशानुसार त्याच प्रभागामध्ये समाविष्ट आहेत.

४) गुगल अर्थ किंवा तत्सम संगणकीकृत नकाशांच्या आधारे प्रभाग रचना करण्यात आली आहे.

५) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ तसेच त्याअंतर्गत नियम व राज्य शासन व राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, निदेश व सूचना यांचे तंतोतंत पालन करण्यात आलेले आहे.

६) प्रभागांच्या हद्दींचे वर्णन, व्याप्ती, लोकसंख्या व आरक्षण योग्य असल्याची खात्री करण्यात आली आहे.

७) प्रारुप प्रभाग रचना उपलब्ध माहितीच्या आधारावर नि:पक्षपातीपणे तयार करण्यात आली आहे.

ठिकाण ---------   स्वाक्षरी

दिनांक---------

नगररचनाकार   उपायुक्त (निवडणूक)   आयुक्त

------------महानगरपालिका

परिशिष्ट - ७

<u>गुगल अर्थ/ MRSAC च्या नकाशांवर प्रभागरचनेची मांडणी करण्याची कार्यपध्दती.</u>

१. गुगल अर्थ डाऊनलोड करणे.

२. फोल्डर तयार करणे.

३. फोल्डरला स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव देणे.

४. पाच सब फोल्डर तयार करावे ज्यांना Placemark, Boundary, EB, Barrier आणि Ward अशी नावे द्यावीत.

५. Placemark फोल्डर उघडून त्यामध्ये गुगल अर्थ नकाशावर असलेले स्थानिक स्वराज्य संस्थेचे स्थान चिन्हांकीत करणे.

६. चिन्हांकीत करणेबाबत संपूर्ण माहितीकरिता व्हिडीओ पहावा. (व्हिडीओ पाहण्यासाठी https://youtu.be/nfRxH3dRuGk या लिंकवर जावे)

७. सर्वप्रथम Patn'tool च्या सहाय्याने Barrier फोल्डरमध्ये सर्व नैसर्गिक सीमांचे उदा. रस्ते, नदी, नाले, अडथळे, इत्यादी रेषा आखून चिन्हांकन करावे.

८. त्यानंतर Polygon'tool च्या सहाय्याने स्थानिक स्वराज्य संस्थेची सीमा ही Boundary फोल्डरमध्ये चिन्हांकन करावे.

९. त्यानंतर Polygon'tool च्या सहाय्याने सन २०११ च्या जनगणनेनुसार EB चे चिन्हांकन करावे. EB फोल्डरमध्ये त्या स्थानिक स्वराज्य संस्थेत असणाऱ्या सर्व प्रगणक गटांची सीमा एक-एक करुन चिन्हांकीत करावी. स्थानिक स्वराज्य संस्थेचे संपूर्ण परिक्षेत्राचे प्रगणक गटांमध्ये समावेश होईल याची दक्षता घ्यावी. जिथे घरे नसतील व क्षेत्र मोकळे असेल, ज्यामुळे ते क्षेत्र कोणत्याही प्रगणक गटात येत नसेल त्या क्षेत्रासाठी शून्य लोकसंख्या असलेला प्रगणक गट तयार करावा आणि हा प्रगणक गट लगतच्या प्रभागात समाविष्ट होईल याची दक्षता घ्यावी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे दोन प्रगणक गटामधील सामायिक सीमा चिन्हांकीत करताना Polygon ची रेषा पूर्णपणे जुळणाऱ्या असाव्यात, त्यामध्ये अंतर नसावे.

१०. त्यानंतर Polygon'tool च्या सहाय्याने Ward फोल्डरमध्ये सर्व प्रभागांच्या सीमांचे चिन्हांकन करावे. प्रभागांच्या सीमा त्या प्रभागात येणाऱ्या प्रगणक गटांच्या सीमांशी जुळवावेत तसेच लगतच्या प्रभागाच्या सीमेशी योग्यतऱ्हेने जुळवावेत. सर्व EB कोणत्या ना कोणत्या प्रभागात समाविष्ट होईल याची दक्षता घ्यावी.

११. या तयार केलेल्या प्रभाग रचनेची KML/KMZ फाईल व image फाईल तयार करावी.

परिशिष्ट ८

----------------------महानगरपालिका

दिनांक : ---------------

अधिसूचना

क्रमांक : ---------------------------, राज्य शासनाने, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या मान्यतेने मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (सन १८८८ चा मुंबई ३) (यापुढे "अधिनियम" म्हणून उल्लेखिलेला) चे कलम ५ व कलम १९ अन्वये प्रारुप अधिसूचना प्रसिध्द करण्याचे ठरविले आहे. सदर अधिसूचनेव्दारे ----------- महानगरपालिका क्षेत्रातील प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चित करण्यात येईल.

२. आणि ज्याअर्थी, प्रारुप मसुदा उक्त अधिनियमाच्या कलम १९(१)(अ) च्या परंतुकाप्रमाणे ---------- महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिध्द करावयाचा आहे. ज्याअर्थी शासनाच्या नगर विकास विभाग यांचे आदेश क्र. ----------- दि. -------- नुसार सदर अधिसुचनेचा प्रारुप मसुदा राजपत्रात प्रसिध्द करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत. आणि त्यानुसार सदर प्रारुप मसुदा प्रसिध्द करण्यात येत असून , उक्त अधिसूचनेचा मसुदा दि. --------- नंतर राज्य शासन अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी, हे राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्या मान्यतेने विचारात घेतील.

३. उक्त अधिसूचनेच्या अनुषंगाने नागरिकांच्या हरकती किंवा सूचना असल्यास आयुक्त, --------- महानगरपालिका यांचेकडे दिनांक --------------- रोजी किंवा तत्पूर्वी लेखी सादर कराव्यात. उक्त तारखेनंतर आलेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

प्रारुप अधिसूचना

ज्याअर्थी, राज्य शासन अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी, यांनी राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्या मान्यतेने, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम ५ व कलम १९ च्या तरतुदीखाली -------- महानगरपालिकेच्या बाबतीत निवडावयाच्या सदस्यांची संख्या ....व प्रभागांची संख्या ....इतकी निश्चित केली आहे .

२. त्याअर्थी, आता राज्य निवडणूक आयुक्त महाराष्ट्र, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम ५ व कलम १९ अन्वये उक्त महानगरपालिका क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती या अधिसूचनेच्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे निश्चित करीत आहेत.

३. या अधिसूचनेच्या तारखेच्या निकटच्या पुढील सार्वत्रिक निवडणूकीच्या प्रयोजनार्थ ही अधिसूचना अंमलात येईल.

अनुसूची

प्रभाग क्रमांक व लोकसंख्या	**प्रभागाचे नाव, असल्यास**	**प्रभागाची व्याप्ती**	**निवडून द्यावयाच्या** सदस्यांची **संख्या**
(१)	(२)	(३)	(४)
१. लोकसंख्या एकूण - अ.जा.- अ.ज.-		व्याप्ती - उत्तर - पूर्व - दक्षिण - पश्चिम -	
२. लोकसंख्या एकूण - अ.जा.- अ.ज.-		व्याप्ती - उत्तर - पूर्व - दक्षिण - पश्चिम -	

१. मराठी व इंग्रजी अधिसूचनेमध्ये प्रभागाच्या वर्णनामध्ये तफावत असल्यास नकाशामधील हद्दीनुसार वर्णन ग्राह्य धरण्यात येईल.

२. महानगरपालिकेच्या क्षेत्राच्या प्रभागांच्या सीमा दर्शविणारे नकाशे कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी महानगरपालिका कार्यालयात उपलब्ध राहतील.

(--------------)

आयुक्त,

------------महानगरपालिका

ठिकाण :

दिनांक :

परिशिष्ट ९

---------------------- MUNICIPAL CORPORATION

dated **............................**

NOTIFICATION

No.--- The State Government with approval of State Election Commission, Maharashtra proposes to make the following Draft Notification under section 5 and 19 of the Mumbai Municipal Corporation Act, (Bom.III of 1888) (hereinafter referred to as the "said Act") to fix for the **-----------------**Municipal Corporation, the number and the extent of the wards into which the said municipal area shall be divided, as shown in the Schedule to this Draft order.

2. And whereas the said Draft Order is hereby published as required by the section 19(1)(A) of the said Act for information of all the residents within the jurisdiction of the **-----------------**Municipal Corporation. And Whereas, vide Urban Development Department order No. ---------- dated ---------- The State Government Maharashtra, has delegated its powers to Municipal Commissioner,------------------------Municipal Corporation to publish the draft in the Official Gazette. Accordingly this Draft Notification is being published and the said draft will be taken into consideration by the State Government with the Approval of the State Election Commission, Maharashtra or an officer authorised by it for this purpose, after --------------

3. And whereas, all persons who desire to raise any objections or suggestions to this draft should submit the same to the Municipal Commissioner, **-------------------** Municipal Corporation, in writing with reasons on or before dated**..................................** Objections or suggestions received thereafter will not be considered.

Draft Notification

WHEREAS, State Government with the approval of the State Election Commission, Maharashtra has specified for --------Municipal Corporation, under Section 5 and 19 of the Mumbai Municipal Corporations Act, the ....Number of Councilors to be elected and ....number of wards.

2. Now, therefore, in exercise of the powers under section 19 of the Mumbai Municipal Corporation Act, The State Election Commission, Maharashtra State hereby fix the number and extent of the wards into which the said Municipal Corporation area shall be divided as shown in the schedule to this Notification.

3. This Notification shall take effect for the purpose of the next general election held immediately following the date of this Notification.

SCHEDULE

Ward No. & Population	**Name of the ward, if any**	**Extent of the Ward**	**Number of Councillors to be elected**
(1)	(2)	(3)	(4)
1. Population Total- SC - ST -		Location – North- East- South- West-	
2. Population Total- SC - ST -		Location – North- East- South- West-	

NOTE:- 1. In case of any discrepancy in description of ward in the Marathi and English Notification, the description as per boundaries shown in the map shall be treated as valid.

2. A map of the Municipal Corporation showing the limits of the wards is available during office hours for inspection in the office of the Municipal Corporation.

(-----------------------)
Municipal Commissioner,
---------------Municipal Corporation

Place :-
Date :- / /

परिशिष्ट - १०

(प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दी- जाहीर सूचनेचा नमुना- मराठी)

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक ------------

जाहीर सूचना

---------------- महानगरपालिकेच्या सन -------- मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे:-

१	प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दीची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक	---------- वार, दिनांक ----------
२	हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग कार्यालयाचे मुख्यालय येथे सादर कराव्यात)	---------- वार, दिनांक -------- ते ---------- वार, दिनांक -------- (दुपारी ३.०० वा. पर्यंत)
टिप: हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरिकांना सुनावणीकरिता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.		

ठिकाण:------------------ **आयुक्त,**

दिनांक:------------------- **------------- महानगरपालिका**

परिशिष्ट – ११

(प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दी– जाहीर सूचनेचा नमुना– इंग्रजी)

---------------MUNICIPAL CORPORATION

GENERAL ELECTION -------------Year)

PUBLIC NOTICE

For the General Election of ----------------------- Municipal Corporation to be held in the Year -----------, the programme for the publication of draft ward boundaries is as follows :-.

1	Date of publishing Notification of the draft ward boundaries	---------- day, Date ----------
2	Period for submitting objections & Suggestions (To be submitted to the Municipal Commissioner for Objections & Suggestion, in Election Office or concerned ward Office)	----------- day, Date ----------- to ----------- day, Date ---------- (upto 3.00 p.m.)
Note: The Citizens who have filed Objections & Suggestions will be informed separately about the date of hearing.		

Place: ------------------- **Commissioner,**

Date: -------------------- **----------------- Municipal Corporation**

परिशिष्ट-१२

हरकती व सूचनांचा गोषवारा

----------- महानगरपालिका

हरकतींचा कालावधी दि. ----------- ते ------------ पर्यंत

अ. क्र.	हरकतदाराचे नाव	हरकतीचे स्वरुप	संबंधित प्रभाग क्रमांक	महानगरपालिका आयुक्तांचे अभिप्राय
१	२	३	४	५
१				
२				
३				
४				
५				

उपायुक्त (निवडणूक)

आयुक्त
------- महानगरपालिका

परिशिष्ट-१३

हरकती व सूचनांवर दिलेल्या सुनावणीवरील शिफारशी

हरकती व सूचनांवर सुनावणी दिल्यानंतर प्राधिकृत अधिकारी यांनी शासनामार्फत राज्य निवडणूक आयोगाकडे अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करावयाचे विवरणपत्र

----------- महानगरपालिका   सुनावणीचा दिनांक ----------

अ. क्र.	आक्षेप क्रमांक	हरकतदाराचे नाव	हरकतीचे स्वरुप	संबंधित प्रभाग क्रमांक	महानगरपालिका आयुक्तांचे अभिप्राय	सुनावणीसाठी प्राधिकृत अधिकारी यांचे अभिप्राय
१	२	३	४	५	६	७
१						
२						
३						
४						
५						

नगररचनाकार   उपायुक्त (निवडणूक)   आयुक्त
------- महानगरपालिका   प्राधिकृत अधिकारी

परिशिष्ट-१४

अंतिम प्रभाग रचनेच्या अधिसूचनेचा नमुना (मराठी)

अधिसूचना

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८

क्रमांक - ----------------- मुंबई महानगरपालिका अधिनियम, (सन १८८८ चा मुंबई ३) (यापुढे सदर अधिनियम म्हणून उल्लेखिलेला)चे कलम ५ व १९ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन प्रारुप अधिसूचना क्र. --------------- दि.--------- च्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे ---------- महानगरपालिका क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चित केल्यासंदर्भात प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा काळजीपूर्वक विचार करुन राज्य शासन अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी, हे राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्या मान्यतेने, खालीलप्रमाणे अधिसूचित करीत आहेत :-

ज्याअर्थी, राज्य शासन अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी, यांनी राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्या मान्यतेने, मुंबई महानगरपालिका अधिनियमांच्या कलम ५ व १९ च्या तरतूदीखाली ---------- महानगरपालिकेच्या बाबतीत निवडावयाच्या सदस्यांची संख्या ....व प्रभागांची संख्या .... इतकी निश्चित केली आहे.

२. त्याअर्थी, आता राज्य शासन अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी, हे राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्या मान्यतेने, मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५ व १९ अन्वये उक्त महानगरपालिका क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती या अधिसूचनेच्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे निश्चित करीत आहे.

३. या अधिसूचनेच्या तारखेच्या निकटच्या पुढील सार्वत्रिक निवडणूकीच्या प्रयोजनार्थ

ही अधिसूचना अंमलात येईल.

अनुसूची

प्रभाग क्रमांक व लोकसंख्या	प्रभागाचे नाव, असल्यास	प्रभागाची व्याप्ती	निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या
(१)	(२)	(३)	(४)
१. लोकसंख्या एकूण - अ.जा.- अ.ज.-		व्याप्ती - उत्तर - पूर्व - दक्षिण - पश्चिम -	
२. लोकसंख्या एकूण - अ.जा.- अ.ज.-		व्याप्ती - उत्तर - पूर्व - दक्षिण - पश्चिम -	

टीप :-

(१) मराठी व इंग्रजी अधिसूचनेमध्ये प्रभागाच्या वर्णनामध्ये तफावत असल्यास नकाशामधील हद्दीनुसार वर्णन ग्राह्य धरण्यात येईल.

(२) महानगरपालिकेच्या क्षेत्राच्या प्रभागांच्या सीमा दर्शविणारे नकाशे कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी महानगरपालिका कार्यालयात उपलब्ध राहतील.

(--------------)

ठिकाण : **आयुक्त,**

दिनांक : **............महानगरपालिका**

परिशिष्ट-१५

अंतिम प्रभाग रचनेच्या अधिसूचनेचा नमुना (इंग्रजी)

NOTIFICATION

Mumbai Municipal Corporation Act, 1888

No. -------------------- In exercise of the powers conferred by section 5 and 19 of The Mumbai Municipal Corporation Act, (Bom.III of 1888) (hereinafter referred to as the "said Act") after carefully taking into consideration the objection & suggestion received, in response to the Draft Notification No. -------------------- dated ------fixing for the ------ Municipal Corporation. The number and the extent of the wards into which the said municipal area shall be divided is shown in the schedule to said Draft Notification. The State Government or its authorised officer, with the Approval of the State Election Commission, Maharashtra or its authorised officer, hereby makes the following Notification.

Whereas the State Government or its authorised officer with the Approval of the State Election Commission, Maharashtra or its authorised officer, as specified for -------- Municipal Corporation under section 5 and 19 of the Mumbai Municipal Corporation Act, the ....Number of Councilors to be elected and ....number of wards.

Now, therefore, in exercise of the powers under section 19 of the Mumbai Municipal Corporation Act, the State Government or its authorised officer with the Approval of the State Election Commission, Maharashtra or its authorised officer hereby fix the number and extent of the wards into which the said Municipal Corporation area shall be divided as shown in the schedule to this Notification.

3. This Notification shall take effect for the purpose of the next general election held immediately following the date of this Notification.

SCHEDULE

Ward No. & Population	Name of the ward, if any	Extent of the Ward	Number of Councilors to be elected
(1)	(2)	(3)	(4)
1. Population Total- SC - ST -		Location – North- East- South- West-	
2. Population Total- SC - ST -		Location – North- East- South- West-	

NOTE:-

1. In case of any discrepancy in description of ward in the Marathi and English Notification, the description as per boundaries shown in the map shall be treated as valid.
2. A map of the Municipal Corporation showing the limits of the wards is available during office hours for inspection in the office of the Municipal Corporation.

(------------------------)
Commissioner,
.... Municipal Corporation

Place :-
Date :-